**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः 21.06.2023** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

**•योग मानवाच्या जीवनाचा चेतना, ऊर्जेसोबत एक प्रकाश देखील असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन. 12 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देश-विदेशात योगाभ्यासाचं आयोजन**

**•राज्यातल्या सहकार क्षेत्रासाठी 3,000 कोटी रुपयांच्या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घोषणा**

**•1500 कोटी रुपयांच्या निधीतून सुरू होणाऱ्या अंबाबाई मंदिर कॉरिडॉरचा शुभारंभ**

**•वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या नीट युजी परीक्षेसाठी यंत्रणा सज्ज**

**•आषाढी एकादशी यात्रेसाठी एसटीच्या साडेपाच हजार विशेष गाड्यांचं नियोजन**

**आणि**

**•परभणीत मंदिर उभारणीच्या कामात झालेल्या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू तर गणपतीपुळे इथं समुद्रात ५ तरुण बुडाले**

**<u>आंतरराष्ट्रीय-योग-दिवस</u>**

संपूर्ण देश योगाच्या चैतन्यानं, ऊर्जेनं भारलेला असून, ही योगाची शक्ती असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आजचा दिवस जगभरात उत्सवाचा दिवस असल्याचं त्यांनी सांगितलं. कोलकात्याच्या ऐतिहासिक रेड रोडवर झालेल्या योगदिनाच्या मुख्य कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर ते बोलत होते. पश्चिम बंगालमध्ये लांखो लोकांनी या कार्यक्रमात प्रत्यक्ष आणि दूरस्थ पद्धतीनं सहभागी होऊन मोदी यांच्यासोबत योगाभ्यास केला.

योग स्वभावामध्ये येतो तेव्हा मानवीय एकतेचा आधार बनतो. केवळ शारीरिक श्रमाचं साधन नव्हे तर योग मानवाच्या जीवनाचा चेतना, ऊर्जेसोबत एक प्रकाश देखील आहे. म्हणूनच यावर्षीची संकल्पना

वयोवृद्ध होत असताना आपण निरोगी, ऊर्जावान आणि सक्रीय राहू शकतो, योग यासाठी आपल्याला मार्ग दाखवू शकतो असंही मोदी यांनी सांगितलं.

दरम्यान, देशभरात आज १२ वा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' साजरा होत आहे. 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' अशी यंदाच्या योगदिनाची संकल्पना असून जगभरात सुमारे अडीच हजार ठिकाणी विविध संस्था संघटनांतर्फे योगविषयक कार्यक्रम होणार आहेत.  देशातील 100 ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्वाच्या ठिकाणी योग दिना निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मध्य प्रदेशातल्या जबलपूर इथं आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित आहेत.

**योगदिन**

राज्याच्या अनेक भागांमध्ये योग दिन साजरा होत आहे. योगदिनाच्या पूर्वसंध्येला पुण्यात भारतीय जनता पक्ष पुणे शहराच्या वतीनं 21 हजार सूर्यनमस्कार घालण्याचा विक्रम करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातल्या विद्यापीठ हायस्कूलमध्येही काल 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला. हिंगोली शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली.  धुळे जिल्ह्यातही कालच योग दिवसाचा कार्यक्रम साजरा झाला. केंद्रीय संचार ब्यूरो, अहिल्यानगर यांच्या वतीनं योग प्रशिक्षण कार्यक्रम आणि चित्रकला स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**इचलकरंजीबँक**

पश्चिम महाराष्ट्रातल्या सहकार आणि साखर उद्योगाला नवे बळ देणारी महत्त्वपूर्ण घोषणा करतानाच ,केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी राज्यातल्या सहकार क्षेत्रासाठी 3,000 कोटी रुपयांच्या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची घोषणा केली. कोल्हापूर जिल्ह्यातल्या इचलकरंजी इथं कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीचं उद्घाटन काल शहा यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे 1,500 कोटी रुपयांचा सहकारी प्रक्रिया सामूहिक प्रकल्प, तर पुण्यातील बंद पडलेले नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह पुनरुज्जीवित करण्यासाठी आणखी 1,500 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर देशासह जगभरातल्या  साखर कारखान्यांना आवश्यक असलेली यंत्रसामग्री तयार करण्याचे काम याठिकाणी केलं जाणार आहे.

शहा यांच्यासह ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत यावेळी कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा नामविस्तार करण्यात आला.

**<u>अमितशहा</u>**

दक्षिणकाशी म्हणून ओळखलं जाणारं करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर आणि परिसर, शासन 15 शे कोटी रुपयांचा निधी खर्चून, विकास कॉरीडॉर म्हणून विकसित करत आहे, ही बाब सर्व भाविकांसाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याची भावना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कोल्हापूर इथं व्यक्त केली. पश्चिम महाराष्ट्र विकास आराखड्याअंतर्गत श्री महालक्ष्मी मंदिर परिसरातील नूतन प्रदक्षिणा मार्ग आणि परिवार देवता मंदिर संवर्धन कामकाजाचा प्रारंभ अमित शाह यांच्या हस्ते काल झाला. यावेळी शाह यांनी सपत्नीक श्री अंबाबाई महालक्ष्मीचं दर्शन घेतलं. त्यानंतर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित कृतज्ञता सोहळा सभेत ते बोलत होते. गृहमंत्र्यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना या उपक्रमाबद्दल विस्तृत माहिती दिली...

**करवीर नगर में मा अंबाबाई के मंदिर का आज महाराष्ट्र सरकार जीर्णोद्धार और कॉरिडॉर निर्माण का काम कर रही है। संपूर्ण मंदिर परिसर का आधुनिक ए आय सज्ज कॅमेरों से सुरक्षा सुनिश्चित हो रही है। हेरिटेज वॉल, लाईट अँड साऊंड शो, मल्टीपर्पज हॉल, अन्नछत्र, पोलीस चौकी और हेरिटेज कोर्ट यार्ड समेत यह मंदिर एक पूर्ण यात्रा धाम के रूप मे छह माह के अंदर ही परिवर्तित हो जायेगा।**

**<u>या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.</u>**

**<u>नीट-यूजी</u>**

वैद्यकीय पदवी प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट यूजी २०२६ फेरपरीक्षा आज होत असून याची पूर्वतयारी म्हणून एनटीए नं काल देशभरात सरावाचं आयोजन केलं होतं. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत व्हावी यासाठीच्या तयारीचा हा भाग होता. देशभरातल्या 551 आणि परदेशातल्या 14 शहरांमध्ये आज 'नीट-यूजी' फेरपरीक्षा होत आहे. यासाठी २२ लाखांहून अधिक उमेदवारांनी नाव नोंदणी केली आहे.

या फेरपरीक्षेसाठी नागपूर मधल्या एका विद्यार्थ्याला अबुधाबी इथे परीक्षा केंद्र देण्यात आल्याची बातमी प्रसारमाध्यमांमधे प्रकाशित झाली होती. एनटीएनं तातडीनं दखल घेत हा प्रश्न सोडवला, या विद्यार्थ्याला नागपूर मध्येच परीक्षा केंद्र दिल्याचं एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह यांनी सांगितलं.

**<u>एसटीगाड्या</u>**

राज्य परिवहन महामंडळानं आषाढी एकादशी यात्रेसाठी यंदा साडे पाच हजार विशेष एसटी गाड्यांचं नियोजन केलं असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यातील कोणत्याही गावातून 40 किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी मागणी केल्यास थेट पंढरपूरसाठी विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या बस सेवेत शासनाच्या सर्व प्रवासी सवलती असणार आहेत. भाविकांच्या सुविधेसाठी पंढरपूर इथं चार तात्पुरती बस स्थानकं उभारण्यात येणार असून, पिण्याचं पाणी, शौचालय, आरक्षण केंद्र आणि चौकशी कक्षासह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**<u>यशवाडी-अपघात</u>**

परभणी जिल्ह्यातल्या यशवाडी इथं नवीन हनुमान मंदिराचं बांधकाम सुरू असताना काल मंदिरातला घुमट कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला असून, 16 भाविक जखमी झाले आहेत. यापैकी एकाची प्रकृती गंभीर असून ,जखमींवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या मंदिराच्या गाभाऱ्याचं काम सुरु असून मंदिरात धार्मिक कार्यक्रमादरम्यान भाविकांची गर्दी झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं असून, राज्य सरकारतर्फे मृतांच्या कुटुंबीयांना 5 लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<u>गणपतीपुळे-दुर्घटना</u>**

गणपतीपुळ्याजवळ समुद्रात काल बुडालेल्या चार व्यक्तींचा शोध अद्याप सुरू असून एक मृतदेह हाती लागला आहे. तटरक्षक दल, मासेमार बोटी आणि पोलीसांचं पथक इतरांना शोधण्याचं काम करत आहेत. छत्रपती संभाजीनगरमधल्या पैठण तालुक्यातल्या बिडकीनमधले १९ तरुण या समुद्रात काल सकाळी पोहण्यासाठी उतरले असताना त्यापैकी पाच जण वाहून गेल्याची घटना घडली.

**<u>हवामान</u>**

येत्या दोन दिवसात दक्षिण कोकण आणि राज्याच्या काही भागात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता असून २४ ते २६ जून पर्यंत मुंबईसह राज्याच्या अंतर्गत भागांपर्यंत पावसाचा जोर वाढेल, असं हवामान विभागाचे निवृत्त अधिकारी कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितलं आहे. सध्या राज्यात केवळ ८ ते ९ टक्के

पाणीसाठा आहे. एल निनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबला असून नागरिकांनी पाण्याचं योग्य नियोजन करून अपव्यय टाळावा, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.**